# ठोस धोरणाअभावी सरकारने संधी गमावली



**नोटाबंदीच्या माध्यमातून डिजिटल व्यवहारांचा आग्रह धरणाऱ्या केंद्र सरकारला ही नवी क्रांती प्रत्यक्षात आणण्यासाठी ठोस धोरण आखता आलेले नाही. हे सरकारचे आणि पर्यायाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मोठे अपयश आहे. केवळ नव्या ॲपची घोषणा करून ही डिजिटल क्रांती प्रत्यक्षात येणार नाही. त्याला पूरक धोरणेही आखावी लागतील. अर्थमंत्री जेटलींनी ही संधी गमावली आहे.**

**उम्मीद कोठावाला,** सीईओ, एक्सटेन्शिया इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी




यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प हा सरकारने डिजिटल युगाच्या दिशेने उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. 'जीएसटी' करप्रणालीची अंमलबजावणी आणि नोटाबंदीचा निर्णय हे दोन्ही बदल याचेच द्योतक आहे. या डिजिटायझेशनच्या प्रक्रियेने प्रत्येक सेक्टरला आणि आयटी उद्योगाच्या गाभ्याला स्पर्श केलेला दिसून येतो. 'स्वयंम' आणि 'स्कील इंडिया मिशन'सारखे उपक्रम हे पूर्णपणे तंत्रज्ञानावर आधारित आहेत. या सर्व यंत्रणेचा पाया असणाऱ्या टेलिकॉम सेक्टरच्या निधीमध्ये सरकारने यंदा घसघशीत वाढ केली आहे. माहिती व तंत्रज्ञानाच्या आधारे युवकांसाठी स्वयम् हे व्यासपीठ तयार करण्यात येणार असून त्यावरून किमान ३५० विविध ऑनलाइन कोर्सेस उपलब्ध केले जाणार आहेत.

'भारत नेट' आणि 'डिजीगाव' या योजनांच्या माध्यमातून ब्रॉडबँड नेटवर्क तळागाळात पोचविण्यात येईल. या डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून टेलिमेडिसीन, शिक्षण आणि कौशल्य विकास आदी बाबी साध्य केल्या जाणार आहेत. 'भीम ॲप' आणि 'आधार पे' यामुळे डिजिटल व्यवहारांनादेखील गती मिळेल. या अर्थसंकल्पात सायबर सुरक्षिततेकडेही सरकारने लक्ष दिल्याचे दिसते.

सध्याच्या वैश्विक अस्थिरतेच्या काळात नव्या संधींचा शोध घेण्यासाठी भारताला काही ठोस उपाययोजना आखणे गरजेचे आहे. हे करताना आपली आर्थिक उद्दिष्टेदेखील डोळ्यांसमोर ठेवावी लागतील. 'एच१-बी' व्हिसाचे आव्हान दूर करण्यासाठी या अर्थसंकल्पामध्ये कोणतीच ठोस तरतूद दिसत नाही. आजही भारताचे माहिती तंत्रज्ञान क्षेत्र बऱ्याच अंशी अमेरिकेवर अवलंबून आहे. सरकारने या वेळी या व्हिसाच्या तिढ्यावर तोडगा काढला असता तर चांगले झाले असते.

डिजिटल अर्थव्यवस्थेमध्ये मूलभूत घटकांमधील अस्पष्टता धोकादायक असते. सरकारला या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून डिजिटल अर्थव्यवस्थेसाठी नेमके कोणतेच धोरण आखता आलेले दिसत नाही. सरकारच्या या नाकर्तेपणामुळे आपण एक मोठी संधी गमावली आहे. ज्या डिजिटल तंत्रज्ञानासाठी सरकारने एवढा आटापिटा चालविला होता. त्यासाठी एकही ठोस पाऊल उचलण्यात आलेले नाही.

**+**

- **'भीम ॲप', 'आधार पे'मुळे डिजिटल व्यवहारांना गती**
- **'स्वयम', 'स्किल इंडिया'मुळे तंत्रज्ञानाचा प्रसार होणार**
- **'भारत नेट', 'डिजिगाव'मुळे ब्रॉडबँड नेटवर्कचा विस्तार**
- **सायबर सुरक्षेवरही अर्थसंकल्पात सरकारचा भर**

**−**

- **डिजिटल अर्थव्यवस्थेसाठी मूलभूत स्पष्टता नाही**
- **तंत्रज्ञानासाठी जागतिक तोडीच्या धोरणाचा अभाव**
- **डिजिटल क्रांतीची संधी सरकारने गमावली, त्यासाठीच्या पूरक धोरणांची सरकारकडून आखणी नाही**
- **'एच १-बी' व्हिसाचे आव्हान दूर करण्यासाठी या अर्थसंकल्पामध्ये कोणतीच ठोस तरतूद दिसत नाही**